माहिती हवीय?

स्वरूप खोपडे, पुणे.

☐ मंदाकिनीने कोणकोणत्या चित्रपटांत भूमिका केली?

– *राम तेरी गंगा मैली, आग और शोला, आखरी बाजी, अग्नी, अपने अपने, कमांडो, देश के दुश्मन, दुश्मन, हवालात, हम तो चले परदेस, जाल, जीवा, जीते है शान से, जंगबाज, कहा है कानून, लढाई, लोहा, मारधाड, मालामाल, मजलूम, मेरा साथी, नागमणी, नया खून, परम धरम, प्यार कर के देखो, प्यार के नाम कुर्बान, प्यार मोहब्बत, शेषनाग, शूरवीर, सिंहासन, जोरदार.*

भरत कालुवाला, माहीम.

☐ मास्टर निसारने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली? नायिका कोण?

– *शिरी फरहाद, लैला मजनू, शकुंतला, चित्र बकावली, गुलरू झरीना, इंद्रसभा*(जहाँआरा कज्जन), *अफजल*(अमीना), *मायाजाल, रंगीला राजपूत कौर परिस्तान*(बिब्बो), *बहारे सुलेमान, किसानकन्या*(पद्मादेवी), *मॉडर्न गर्ल*(झेबुन्नीसा), *किमयागार* (खुरशिद),या चित्रपटात निसारने नायकाची भूमिका केली. यापैकी *चित्रबकावलीत* ४१, *गुलेरू झरीनात* ३७ व *इंद्रसभात* ७० गाणी होती. नंतरच्या काळात ते आपल्या चित्रपटातील एक्स्ट्रा कलाकार बनले होते. *सीआयडी, लीडर, बुट पॉलीश, आजाद, कोहिनूर, साधना, चार दरवेश* या चित्रपटात ते एक्स्ट्रा म्हणून पडद्यावर दिसले होते. *चोर हो तो ऐसा*त ते एक्स्ट्रा म्हणून शेवटचे पडद्यावर दिसले होते. १३ जुलै १९८०ला त्यांचं निधन झालं.

उमेश सुर्वे, तुळजापूर.

☐ मुकेशने रफी, किशोर व लता मंगेशकर यांच्याबरोबर कोणती गाणी गायली? चित्रपट कोणते? दिग्दर्शक, गीतकार, संगीतकार कोण?

– 'देख के तुमको दिल डोला है, हमको तुमसे हो गया है प्यार क्या करे बोलो तो जिये...' हे १९७७च्या *अमर अकबर अँथनी*तलं गाणं मुकेशने रफी, किशोर व लता यांच्याबरोबर गायलं होतं. या गाण्यात त्या चौघांच्याबरोबर प्रवीन बाबीचा आवाजदेखील होता. दिग्दर्शक मनमोहन देसाई, गीतकार आनंद बक्षी, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल.

अ. वा. कोर्टीकर, पंढरपूर.

☐ 'तुझे क्या सुनाऊं मैं दिलरुबा, तेरे सामने मेरा क्या हाल है...' हे गाणं कोणत्या कलाकारांवर चित्रित करण्यात आलं आहे? चित्रपटाचं नाव काय? दिग्दर्शक-संगीतकार कोण?

– 'तुझे क्या सुनाऊं मैं दिलरुबा, तेरे सामने मेरा क्या हाल है...' हे गाणं *आखरी डाव* या चित्रपटात अभिनेता शेखरवर चित्रित करण्यात आलं होतं. दिग्दर्शक महेश कौल, संगीतकार मदनमोहन.

महादेव माकर, हडपसर.

☐ अमिताभने 'विजय' हे नाव कोणकोणत्या चित्रपटांत धारण केलं?



जंजीर चित्रपटापासून अमिताभच्या 'विजय' पर्वाची सुरुवात झाली.

– अनके चित्रपटांत. *जंजीर*पासून त्याच्या या नावाची सुरुवात झाली.

रविकांत साखरे, जामखेड.

☐ हिंदीतल्या कोणकोणत्या अभिनेत्याने किंवा अभिनेत्रीने मराठी चित्रपटात पाहुणे कलाकार म्हणून भूमिका केली आहे? त्या चित्रपटांची नावं सांगा.

– पूर्णिमा(*कल्याणचा खजिना*), साधना बोस(*नंदकिशोर*), डेव्हिड(*आपलं घर, महात्मा, फकिरा*), गोप(*आपलं घर*), आगा(*पुनवेची रात, प्रीती संगम, सुख आले माझ्या दारी*), हेलन(*कीचकवध, वाट चुकलेले नवरे*), हनी ईराणी(*एक धागा सुखाचा, सूनबाई*), उल्हास(*बाप माझा ब्रह्मचारी*), डेझी ईराणी(*बाप माझा ब्रह्मचारी*), मिनू मुमताज(*रंगल्या रात्री अशा*), नाझ(*सोनियाची पाऊले*), मनमोहन कृष्ण, राज मेहरा(*छोटा जवान*), टुनटुन(*एक दोन तीन*), अशोककुमार(*शेवटचा मालुसरा, हा खेळ सावल्यांचा*), मधुमती(*तोचि साधू ओळखावा, सावली प्रेमाची, बायांनो नवरे सांभाळा*), जॉनी वॉकर, बेला बोस(*श्रीमंत मेहुणा पाहिजे*), जयराज(*छोटा जवान, फकिरा*), इंद्राणी मुखर्जी(*अपराध*), ओमप्रकाश (*घरकुल*), संजीवकुमार(*दोन्ही घरचा पाहुणा*), अमरीश पुरी(*शांतता कोर्ट चालू आहे!*), अरुणा ईराणी(*आंधळा मारतो डोळा*), इफ्तीकार हरिंद्रनाथ चटोपाध्याय, महिपाल (*राजा शिवछत्रपती*), बिंदू(*भरारी, राजा शिवछत्रपती, माफीचा साक्षीदार*), भूषण तिवारी(*शूरा मी वंदिले*), देवेन वर्मा(*हा खेळ सावल्यांचा, दोस्त माझा मस्त*), ओमपुरी (*घाशीराम कोतवाल*), सारिका(*पारध*), गोपीकृष्ण(*बायांनो नवरे सांभाळा*), रेखा (*फटाकडी*), ज्यू. मेहमूद(*सवत*), जितेंद्र (*मोसंबी नारंगी*), कल्पना अय्यर(*गल्ली ते दिल्ली, मायबाप*), रती अग्निहोत्री(*गुलछडी*), राज बब्बर(*सुलक्षणा*), विद्या सिन्हा(*बिजली*), अमजद खान(*हिचं काय चुकलं*), सतीश शहा (*गंमत जंमत*), कुलभूषण खरबंदा(*प्रेम करूया खुल्लम खुल्ला*), पद्मा खन्ना(*वहिनी साहेब*), स्वप्ना(*आई पाहिजे*), शत्रुघ्न सिन्हा(*अंटीने वाजवली घंटी*), जॉनी लिव्हर(*भुताचा भाऊ*), अनुराधा पटेल(*इना मिना डिका*), अंबर व चन्ना रूपारेल(*विधी लिखित*), दीप्ती नवल (*सूर्योदय*), जॅकी श्रॉफ, बिरबल, अमरीश पुरी, प्रेम चोप्रा, गुलशन ग्रोव्हर, गोगा कपूर, रजा मुराद(*उपकार दुधाचे*), किमी काटकर (*एक फूल चार हाफ*), सत्येन कप्पू(*मस्करी*), शक्ती कपूर(*सगळे सारखेच*), अमिताभ व जया बच्चन(*अक्का*), विजयेंद्र घाटगे(*माझं सौभाग्य*), अनिता राज, मधू मल्होत्रा(*जसा बाप तशी पोर*), ऋषी कपूर, श्रीदेवी(*हल्ला गुल्ला*), गोपीकृष्ण(*बायांनो नवरे सांभाळा, आज झाले मुक्त मी*), मेहमूद(*या मालक*), राजेश खन्ना, मुक्री(*सुंदरा सातारकर*), जलाल आगा(*गारंबीचा बापू*), राज कपूर, शम्मी कपूर(*धडाका*). ✶